## <u>नियमीत दिवाणी दावा क्र. १८८/२०२४ मधील निशाणी १६ खालील आदेश</u>

वादी व वकील हजर. वादी यांनी आज रोजी प्रकरण बोर्डवर घेवून प्रस्तूत प्रकरणातील प्रतिवादी हे बेकायदेशीर रित्या रस्ता करीत असलेने जैसेथे परिस्थीती ठेवणेसाठी प्रस्तूत अर्ज दाखल केला आहे. वादी यांनी कथन केले की, प्रतिवादी हे तहसिलदार यांच्या ओदशानुसार अंमलबजावणीचे प्रकरण दाखल न करता मनुष्यबळाच्या जोरावर बेकायदेशीररित्या वादीच्या जमीनीतून रस्ता करत आहेत. सबब वादी यांनी जैसेथे परिस्थीती ठवेणेचा आदेश पारीत करणेची विनंती केली. वादीने कथनाच्या पृष्टयार्थ दाखल केलेल्या फोटो मध्ये प्रतिवादींनी रस्ता करणेसाठी नेमके जे.सी.बी. आणुन रस्ता करत असलेबाबत अथवा मुरूम टाकत असलेबाबत कोणतीही परीस्थीती दिसून आले नाही. वादी यांनी दाखल केलेल्या फोटोवरून आजतागायत जशास तसे असलेचे प्रथमदर्शनी दिसते. त्यामुळे प्रतिवादीच्या गैरहजेरीत जैसेथे परिस्थीती आदेश करणे न्यायाचे नाही. तसेच प्रस्तूत प्रकरणातील प्रतिवादी हे अभिलेखावर हजर झाले असून त्यांचे म्हणणे घेणे गरजेचे आहे. त्यामुळे दिनांक १६/११/२०२४ रोजी प्रतिवादीचे म्हणणे घेणेसाठी ठेवणेत येत आहे.

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2024.11.10 17:47:20 +0530

विटा. (श्रीमती.अ.ब.सोनटक्के)

दिनांक –११.११.२०२४. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, विटा,

ता.खानापूर, जि.सांगली